**प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र - विद्यार्थ्यांची संपादणूक पातळी वाढविणेबाबत उपाययोजना**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एसएसए-२०१६/प्र.क्र.११५/एसडी-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ६ जुन, २०१६

**संदर्भ :**

१) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्र संकीर्ण-२४११/(८०/११)/अर्थसंकल्प दिनांक २३/९/ २०११
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्रमांकः शैगुवि-२०१५/(८०/१५)/एसडी-६ दिनांक २२/६/२०१५
३) उद्योग उर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४ दि ३०/१०/२०१५
४) वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१६/प्र.क्र८९/अर्थ-३ दिनांक २०/४/२०१६
५) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई यांचे पत्र क्रमांक : मप्राशिप/सशिअ/गुणवत्ता/२०१६-१/१००७ दिनांक २६/४/२०१६

**प्रस्तावना :**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ ची राज्यात दिनांक १ एप्रिल २०१० पासून अंमलबजावणी करण्यात आली आहे. राज्यातील प्रत्येक ६ ते १४ वयोगटातील मुलांस गुणवत्तापुर्ण शिक्षण प्राप्त करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. विविध शैक्षणिक सर्वेक्षण अहवालात सन २०१५ पर्यंत सातत्यने मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तेत घसरण झाल्याचे चित्र दिसून येते. शिक्षण हक्क कायद्यातील कलम २९ (२) (ह) नुसार सर्व मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची तरतूद आहे. राज्यातील १००टक्के मुलांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी गरजाधिष्ठित कृतीकार्यक्रमाची आखणी शासनाने केली आहे. त्यानुषंगाने १०० टक्के मुले शाळेत दाखल होवून, नियमित उपस्थित राहून, गुणवत्तापूर्ण शिकतील यासाठी राज्यामध्ये प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची संदर्भाधीन दिनांक २२ जून २०१५ च्या शासन निर्णयानुसार सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी सुरु केली आहे . राज्यात सर्वच जिल्ह्यात डिजिटल, एबीएल, आयएसओ शाळा मोठ्या संख्येने होत आहेत. प्रत्येक मुल सर्व विषयातील क्षमता अवगत करून निर्धारित अध्ययन संपादणूक पातळीपर्यंत पोहोचेल जेणेकरून शाळा प्रगत होईल. शिक्षक व पर्यवेक्षक यंत्रणा जोमाने कार्य करत असून त्याची परिणीती शाळा प्रगत होण्यात होत आहे. तसेच राज्यात जवळपास सर्वच शाळा ज्ञानरचनावाद दृष्टिकोनाचा अवलंब करत आहेत. त्याचबरोबर राज्याची गुणवतेच्या दिशेने योग्य वाटचाल होत असल्याचे विचारात घेवून भारत सरकारने सर्व शिक्षा अभियानच्या सन २०१६-१७ च्या वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकात अध्ययन समृद्धी कार्यक्रम मंजूर केला आहे. हे कार्य करत असतांना विद्यार्थ्यांना संपादणूक पातळी वाढविण्याकरीता पुरक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देणे अणिवार्य आहे. यासाठी केंद्र पुरस्कृत सर्व शिक्षा अभियानांतर्गत केंद्र शासनाने निधी मंजूर केला आहे. याशिवाय त्यासाठी सन २०१६-१७ या वर्षात २२०२H६७९ या लेखाशिर्षांतर्गत शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी राज्य शासनाने निधी अर्थसंकल्पीत केला आहे. राज्य शासनाने अर्थसंकल्पीत केलेल्या तरतुदीमधील निधी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेस उपलब्ध करुन देण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई यांनी शासनास विनंती केलेली आहे. या विनंतीच्या अनुषंगाने शासनाने राज्यातील शासकीय प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांची संपादणूक पातळी वाढविण्यासाठी पुरक असे शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी सन २०१६-१७ या वर्षात २२०२H६७९ या लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पीत असणाऱ्या तरतुदीतून निधी उपलबध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी संदर्भाधीन दिनांक २६ एप्रिल, २०१६ च्या पत्रान्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावानुसार राज्यातील शासकीय प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची संपादणूक पातळी वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांना पुरक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५ च्या शासन निर्णयातील नमूद तरतुदींचे पालन करुन ई-निविदा प्रक्रिया राबवून विद्यार्थ्यांना पुरक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे.

३. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे पुरक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी रुपये ४७२०.०० लक्ष (अक्षरी रु. सत्तेचाळीस कोटी विस लाख) इतका निधी “मागणी क्रमांक ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८००-इतर खर्च, (०१) (१०) विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविणे (२२०२H६७९), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)” या योजनांतर्गत योजना लेखाशिर्षामधून खर्च करण्यात यावा.

४. याबाबत शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणुन घोषित करण्यात येत आहे. नियंत्रक, आहरण व संवितरण अधिकारी यांनी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई (सर्व शिक्षा अभियान) यांच्या मागणीप्रमाणे विनियोगाकरीता सदरचा निधी तातडीने त्यांना उपलब्ध करुन द्यावा.

५. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधीन दिनांक २०/४/२०१६ च्या परिपत्रकाच्या मान्यतेच्या अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकातील परिच्छेद ७ ते १८ मधील अटींची तसेच, परिपत्रकाच्या परिशिष्ठातील अनु.क्र. ९ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील मुद्दा क्रमांक १ ते ८ मधील बाबी या आदेशासाठी लागू नाहीत. सदरचा निधी खर्च करतांना उद्योग विभागाच्या दिनांक ३०/१०/२०१५ च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी व सदरचा निधी चालू वर्षातच पुर्णपणे खर्च होईल याची दक्षता महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने घ्यावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०६०६१४०८०२८४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Baban Ranganath Mali

Digitally signed by Baban Ranganath Mali
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=058a3365edca1bab7b5a512fa9b602a739d12b55819b89fd7154a7a28ccbaa1e, serialNumber=d2974b67a90018e618d5e11ffd00382f063542cc3d866753cfd5a4ad652b1908, cn=Baban Ranganath Mali
Date: 2016.06.06 15:31:24 +05'30'

**(बी. आर. माळी)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
३. मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
४. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर

७. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
८. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे / मुंबई
१०. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई स्थानिक निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
११. उपसचिव (एसडी/एसएम/अर्थसंकल्प), शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. उपसचिव, वित्त / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई
१४. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था (विद्या परिषद) पुणे
१५. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१६. सहसंचालक (वि व ले.) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई
१७. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद सर्व
१८. लेखाधिकारी, प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे
१९. निवडनस्ती, (एसडी-१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई